M.A. (PART-I)
MARATHI
SUDY OF FORMS OF LITERATURE-STORIES (REV)
(PAPER-I) (MAY- 2018)

QP Code : 28512

(3 Hours) [Total Marks : 100

सूचना - १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
२) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. अ) साहित्यप्रकारांच्या वर्गीकरणाची विविध तत्त्वे सांगून कथा या साहित्य प्रकाराच्या स्वरूपविशेष सांगा.

किंवा

आ) अनुक्रमे महाकाव्य, कथा आणि कादंबरी हे कथनात्म साहित्याच्या विकासातील तीन प्रकार आहेत मात्र त्यांमध्ये साम्यभेद आहेत, या विधानाची चर्चा करा.

२. अ) दिवाकर कृष्णांची कथा व्यक्तींच्या बाह्य वर्णनापेक्षा त्यांच्या मानसविश्वाचा सूक्ष्मपातळीवरून वेध घेतात या विधानाची चर्चा करा.

किंवा

आ) जीवनाची निरर्थकता आणि तुटलेपण ही दोन प्रमुख आशयसूत्रे जी. ए. कुलकर्णी यांच्या कथामधून प्राधान्याने चित्रित झालेली दिसतात. या विधानाची सत्यता पटवा.

३. अ) आलोक या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणाचे विशेष सांगा.

किंवा

आ) गंगाधर गाडगीळ आणि बाबुराव बागूल यांच्या कथामधील वातावरण निर्मितीमध्ये कोणते भेद आहेत ते साधार सांगा.

४. अ) ग्रामीण जीवनातील कोणत्या प्रकारच्या मूल्यसंस्कृतीचे चित्रण सखा कलाल यांच्या ढग या कथासंग्रहातून झाले आहे.

किंवा

आ) आधुनिक स्त्रीच्या बंडखोर, नव्या विचारांनी परंपरागत विचारांना कसा नकार दिला आहे, हे गौरी देशपांडे यांच्या कथांमधील स्त्रीपात्रांच्या मानसविश्वाच्या आधारे स्पष्ट करा.

५. अ) कमल देसाई यांची कथा समाजातील विविध समस्या पात्रांच्याआधारे कशाप्रकारे मांडतात ते साधार स्पष्ट करा.

किंवा

आ) **पुढील पैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.**
१) कथा आणि ललितगद्य या कथनपर साहित्यप्रकारातील साम्यभेद
२) दिवाकर कृष्णांच्या कथेतील बालमानस
३) आलोक कथासंग्रहातील भाषा

---------- ----------

**M.A. (PART-I)**
**MARATHI**
**HISTORY OF MARATHI LITERATURE (1874-1960)**
**(PAPER-III) (MAY- 2018)**

**Q.P. Code : 28711**

[वेळ : ३ तास] [ गुण : १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना : १. कोणतेही पाच प्रश्न सोडवा.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**प्र.१. अ)** '१८७४ ते १९२० या कालखंडातील निबंध वाङ्मयाने आधुनिक मराठी गद्याचा पाया रचला' या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

**ब)** १८७४ ते १९६० या कालखंडातील साहित्य समीक्षा विचाराचा आढावा घ्या.

**प्र.२. अ)** १८७४ ते १९२० या कालखंडातील नाट्य वाङ्मयाच्या स्वरूप – वैशिष्ट्यांची सविस्तर चर्चा करा.

**किंवा**

**ब)** १८७४ ते १९२० या कालखंडातील विनोदी वाङ्मयाच्या स्वरूपाचा आढावा घ्या.

**प्र.३. अ)** १९२० ते १९६० या कालखंडातील कादंबरीत विषय आणि रचनादृष्ट्या आलेली विविधता साधार स्पष्ट करा.

**किंवा**

**ब)** १८७४ ते १९६० या कालखंडातील प्रवासवर्णन लेखनाची माहिती लिहा.

**प्र.४. अ)** अत्रे – रांगणेकर – वरेरकर यांनी मराठी नाट्यसृष्टीला दिलेल्या योगदानाचा सविस्तर आढावा घ्या.

**किंवा**

**ब)** १८७४ ते १९६० या कालखंडातील 'लघुकथा ते नवकथा' या वाटचालीचा सविस्तर परामर्श घ्या.

**प्र.५. अ)** १९२० ते १९६० या कालखंडातील 'कविता' या साहित्यप्रकारात कोणकोणते प्रयोग झाले याचा सविस्तर आढावा घ्या.

**किंवा**

**ब)** १८७४ ते १९६० या कालखंडातील ललित गद्याचा विकास कशाप्रकारे होत गेला ते साधार स्पष्ट करा.

**प्र.६.** प्रत्येक गटातील एक टिपा लिहा.

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| १. निबंधमाला | १. राम गणेश गडकरी |
| २. कीचकवध | २. गंगाधर गाडगीळ |
| ३. रविकिरण मंडळ | ३. हरी नारायण आपटे |
| ४. मनोरंजन | ४. माधव ज्युलियन |

*******************

**M.A. (PART-I)**
**MARATHI**
**LINGUISTIC STUDY OF MARATHI LANGUAGE**
**(PAPER-V) (MAY- 2018)**

**Q. P. Code: 37353**

वेळ ३ तास एकूण गुण १००

सूचना

१. कोणतेही **पाच** प्रश्न सोडवा
२. **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.
३. प्रत्येक विभागातील किमान **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे
४. दोन्ही विभागांची उत्तरे **एकाच** उत्तरपत्रिकेत लिहा.

## विभाग १

१. ऐतिहासिक भाषाविज्ञान म्हणजे काय ते सांगून त्याचे सामर्थ्य व मर्यादा सविस्तर स्पष्ट करा.

२. स्वनपरिवर्तन कशास म्हणतात ते सांगून त्याचे प्रकार साधार स्पष्ट करा.

३. अर्थपरिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट करा व त्यामागील कारणांचा साधार परिचय करून द्या.

४. वैद्य- गुणे वादाचे स्वरूप समजावून द्या व त्याआधारे मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधातील विविध सिद्धांतांचा परामर्श घ्या.

५. पुढीलपैकी कोणत्याही दोहोंवर विवेचक टिपा लिहा.
   अ) भाषेच्या कालक्रमिक अभ्यासाचे महत्त्व
   आ) अर्थपरिवर्तनाचे प्रकार
   इ) स्वनपरिवर्तनाची कोणतीही तीन कारणे
   ई) पीजिन आणि क्रिऑल भाषा
   उ) मध्यकालीन मराठी भाषेची वैशिष्ट्ये

## विभाग २

६. वर्णनात्मक भाषाभ्यास पद्धतीचे ठळक विशेष साधार सांगा.

७. उच्चारण स्थानानुसार स्वनांचे वर्गीकरण कसे केले जाते, ते मराठी स्वनव्यवस्थेच्या आधारे स्पष्ट करा.

८. भाषेतील रूपिम प्रक्रिया उलगडून दाखवा.

९. प्रमाण मराठी भाषेच्या संदर्भात वऱ्हाडी बोलीचा परिचय करून द्या.

१०. पुढीलपैकी कोणत्याही दोहोंवर विवेचक टिपा लिहा.
   अ) चॉम्स्कीचा भाषाविषयक सिद्धांत
   आ) उच्चार व लेखन यातील परस्परसंबंध
   इ) प्रथमोपस्थित संघटक विश्लेषण पद्धती
   ई) वाक्याचे पृथक्करण
   उ) प्रमाणभाषा व बोली यांच्यातील अनुबंध

***************

**M.A. (PART-I)**
**MARATHI**
**MODERN MARATHI PROSE & POETRY (1960-ONWARDS)**
**(PAPER-VII) (MAY- 2018)**

**Q.P. Code :28706**

**[वेळ: ३ तास]** [अंक: १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना: १. कोणतेही पाच प्रश्न सोडवा.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

१. अ) साठोत्तरी मराठी वाङमयनिर्मिती मागील ठळक आशयसुत्रे सांगून त्याआधारे दि. पु. चित्रे यांच्या 'कविता' या काव्यसंग्रहाची ठळक वैशिष्टये सोदाहरण सपष्ट करा.

**किंवा**

ब) पारंपरिक मराठी प्रेम कवितेपेक्षा साठोत्तरी मराठी कविता वेगळ्याच प्रेमानुभूती व्यक्त करू लागली' या विधानाची दि. पु. चित्रे यांच्या काव्यसंग्रहाच्या विशेष संदर्भाने चर्चा करा.

२. अ) श्री. दा. पानवलकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते पैलू त्यांच्या कथांमधून आढळून येतात. ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

ब) 'सूर्य' आणि 'झळा' या कथांमधून संवेदनशील कोवळ्या मनाचा वेध श्री. दा. पानवलकरांनी कसा घेतला आहे ते लिहा.

३. अ) 'देवांसि जिवे मारिले' ही कादंबरी विज्ञानयुगातील माणसाची आत्मकेंद्रित वृत्ती दाखवणारी ठरते या विधानाची सत्यता पारखा.

**किंवा**

ब) मानवी जीवसृष्टी व विज्ञान यांच्यातील नाते 'देवांसि जिवे मारिले' या कादंबरीत कशाप्रकारे चित्रित झाले आहे? विवेचन करा.

४. अ) 'मुल्याधिष्टीत राजकारण आणि स्वार्थी राजकारण यांच्यातील विरोधाभास 'सूर्यास्त' मधून गडदपणे सामोरा येतो' या विधानाची चिकित्सा करा.

**किंवा**

ब) एक शोकांतिका म्हणून 'सूर्यास्त' या नाटकाचे मुल्यमापन करा.

५. अ) दलित आत्मकथन लेखनामागील प्रेरणा 'बिराड' या आत्मकथनातून नेमकेपणाने स्पष्ट होतात का ? सविस्तर चर्चा करा.

**किंवा**

ब) बिराडच्या निवेदकाच्या जीवनसंघर्षाचे स्वरूप साधार लिहा.

६. टिपा लिहा. **(कोणत्याही दोन)**

अ) जुलाय १९५६ या कवितेतील अनुभव
ब) 'चांदण' या कथेतील अनुभव विश्व
क) देवांसि जिवे मारिले शीर्षकाची यथार्थता
ड) 'सूर्यास्त' मधील अप्पाजींचा शेवट
इ) बिराडमधील निवेदकाचे बाबा

**********